**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती शोभा दत्तात्रय सोनवणे
गांव देलवंडी,पो. कुंभारगांव,
ता. करमाळा,जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
सुरक्षा आयुक्त (डी. एस. सी.),
आर. पी. एफ पुणे - १

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१/२०१०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.३.२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.४.२००९ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.७.५.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.६.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री. दत्तात्रय सखाराम सोनवणे आर. पी. एफ. नं. ४६०४ यांच्या सेवापुस्तकामधील जातीच्या दाखल्याची छायांकित प्रत. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती शोभा दत्तात्रय सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाविरूध्द अपील केले आहे. ते सार्वजनिक प्राधिकरण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या

अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.१.२०१०**

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. ॲड. खतीब वकील
असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट प्रॅक्टिसिंग
बिफोर द चॅरिटी कमिशनर ऑफ महाराष्ट्र,
१३०/१६, सोलापूर, झेड पी. पी. ओ. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००५ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.२०.१.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.२.२००६ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-</u>** सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० च्या कलम २०, २२, २३, अ व ५० अ नुसार दि.२६.६.२००१ ते ३१.३.२००२ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयाच्या प्रती. | |

**<u>विवेचन</u>**

सोलापूर येथील तात्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यानी दिलेल्या अंतिम निर्णयाची तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून मिळाली नाही. व अपिलीस प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी

अपिलाची योग्य प्रकारे दखल न घेता अपिले फेटाळली, या कारणावरून अपिलकर्ता श्री. खतीब वकील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आपण दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय व्हावा, उपस्थितीची आवश्यकता नसल्याचे अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी दि. २१.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी आयोगाकडे सादर केलेल्या अपीलासोबत अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच श्री.वकील यांनी त्यांच्या यापुर्वी दाखल केलेल्या अपील क्र ८३ ते ८७/सोलापूर या अपीलातील विषय व हया अपिलातील विषय एकच असल्याने सदर अपिल प्रकरणी दि. २४.८.२००९ रोजी आयोगाने दिलेले आदेश याही अपिलाला लागू आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्रीमती विद्या रघुनाथ बागुल
अ-२८५, कर्णिकनगर, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक धर्मादाय आयुक्त (म.)
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
आरोग्यअधिकारी,
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००/२०१०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०..११.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१२.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. .१.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** कर्णिक नगर मधील भटक्या व उनाड कुत्र्यांना विष देऊन हत्या केलेल्या कर्मचा-यांवर केलेल्या कारवाईची माहिती द्यावी, कारवाई करावी, | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्रीमती विद्या रघुनाथ बागुल यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. सदरचे अपील विहीत मुदतीत केलेले नाही,

व सबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याची मागणी व खुलाशाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. या बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२२.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मंहमद बाबालाल मुल्ला — अपीलकर्ता
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी. सातारा

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचीव तथा संचालक, (विजभज),
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मंहमद बाबालाल मुल्ला<br>३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी. सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | सदस्य सचीव तथा संचालक, (विजभज),<br>संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>श्री. एल. एस. माळी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे<br>श्री. ई. एस. गायकवाड |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालाची प्रत व अनुषंगिक माहिती आपल्याला जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी दिली नाही. राज्य माहिती

आयोगाकडे अपील दाखल केल्यानंतर शुल्क भरण्याबाबत कळविले. हे लक्षात घेता माहिती नि:शुल्क मिळावी व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. महंमद बाबालाल मुल्ला यांनी केली.

श्री. मुल्ला यांनी मागितलेली माहिती सुमारे ७०० पृष्ठांची आहे. छायाप्रतीचा खर्च भरून ही माहिती घ्यावी. असे श्री. मुल्ला यांना दि. ९.३.२००७, दि.९.४.२००७, दि. १७.५.२००७ अशा तीन पत्रान्वये कळविले होते. राज्य माहिती आयोगाला दि. ११.९.२००८ च्या पत्रान्वये या पत्राच्या प्रतीसह त्याबाबतचा अहवाल सादर केला होता व त्याची प्रतही श्री. मुल्ला यांना पाठविली होती. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे श्री. इ.एस.गायकवाड यांनी केले. शुल्क भरल्यावर त्वरित माहिती देण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे श्री. एल.एस. माळी यांनी सांगितले. हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि श्री. मुल्ला यांनी पाठविलेल्या पत्रांची नोंद असलेल्या जावक बारनिशीची छायांकित प्रत आयोगाला सादर करावी. अशी प्रत सादर करता न आल्यास जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे श्री. ई. एस. गायकवाड यांनी खुलासा करावा व श्री. मुल्ला यांना माहिती नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. ही बाब गंभीर आहे. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग यांनी दि.१५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा, अन्यथा ते पुढील कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. १८.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

सांगली अर्बन को.ऑप.बँक लि.
सांगली तर्फे अधिकृत इसम
श्री. हरिभाऊ पांडुरंग मांधळे,
प्रधान कार्यालय ४०४, खाणभाग,
सांगली

..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हाधिकारी यांचे चिटणीस
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१४/२००९ सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक ३१.१०.२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २६.११.२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक १९.१.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता सांगली अर्बन को.ऑप.बँक लि. तर्फे अधिकृत इसम श्री. हरिभाऊ पांडूरंग मांधळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल केले आहे. सदर अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांनी त्यांच्या आदेश क्र. ममाअ-०५/अपिल क्र.६८/०८, दि.१९/१/२००९ रोजी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. सदर निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २९/१/२००९ रोजी दिलेल्या निवेदनाची लेखी

प्रत आयोगास दि. ३०/१/२०१० पर्यंत सादर करावी. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीस पात्र राहतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील पूर्तता करण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस यांना देऊनअपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि. १९-०१-२०१०.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

सांगली अर्बन को.ऑप.बँक लि.
सांगली तर्फे अधिकृत इसम
श्री. हरिभाऊ पांडुरंग मांधळे,
प्रधान कार्यालय ४०४, खाणभाग,
सांगली

..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हाधिकारी यांचे चिटणीस
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१४/२००९ सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक ३१.१०.२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २६.११.२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक १९.१.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता सांगली अर्बन को.ऑप.बँक लि. तर्फे अधिकृत इसम श्री. हरिभाऊ पांडूरंग मांधळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिल केले आहे. सदर अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांनी त्यांच्या आदेश क्र. ममाअ-०५/अपिल क्र.६८/०८, दि.१९/१/२००९ रोजी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. सदर निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २९/१/२००९ रोजी दिलेल्या निवेदनाची लेखी

त आयोगास दि. ३०/१/२०१० पर्यंत सादर करावी. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय ाधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीस पात्र राहतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील पूर्तता करण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे चिटणीस यांना देऊनअपील निकाली काढण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. १९-०१-२०१०.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.सुभाष किसनराव धर्माधिकारी
५७२, नाना पेठ, पुणे ४११ ००२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वाडीया कॉलेज चौक,
ढोले-पाटील रोड, पुणे ४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अध्यक्ष,
श्री निवडुंगा विठ्ठल देवस्थान ट्रस्ट,
५७१/७२, नाना पेठ, पुणे ४११ ००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२७+११४८/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०२.२००६ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाची तारीख | दि.२७.७.२००६ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** श्री निवडुंगा विठ्ठल देवस्थान परिसरात उभारलेल्या इमारतीच्या अनुषंगाने बांधकाम अंदाजपत्रक,नकाशा, निविदा इ. ची माहिती, तसेच देवस्थानच्या जमाखर्च व लेखापरीक्षणासंबंधीची माहिती | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री.सुभाष किसनराव धर्माधिकारी यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे सदरची अपिले दाखलयोग्य ठरत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री मुक्तार नजीर पटेल
२५५, शानदार चौक, ता.ऑफिसच्या पाठीमागे,
मस्जिदच्या शेजारी, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याध्यापक,
आयेशा उर्दू प्राथमिक शाळा, मोमीन नगर,
मुळेगाव रोड, हैदराबाद रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५/२०१०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.२.२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.५.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** आयेशा सरोवर शाळेच्या कागदपत्रांची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री मुक्तार नजीर पटेल यांनी राज्य माहिती आयोकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय

इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२७.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.रविकिरण बाबासो चव्हाण
ग.नं.२४८, शिवाजीनगर, सांगोला, **अपीलकर्ता**
जि. सोलापूर

**विरूध्द**

जन माहिती अधिकारी तथा
विशेष भूसंपादन अधिकारी क्र.-५ **उत्तरवादी**
प्रशासकीय इमारत, ब विभाग सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६/२०१०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.७.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.१०.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मौजे कडलास येथील ग.नं.३०२ मधील रस्त्यासाठी संपादित केलेल्या क्षेत्राची माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रविशंकर बाबासो चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

१) श्री.शशिकांत दत्तात्रय खैरे
२) श्री.सोपान जगन्नाथ भोंडवे
मु.पो.खंडुखैरेवाडी, ता.बारामती, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
जर्मन प्रकल्प विभाग, जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६७/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.५.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.६.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.७.२००७ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** ग्रामपंचायत, चांदगुडेवाडी हद्दीत जर्मन प्रकल्पातून झालेल्या नित्कृष्ट दर्जाच्या कामकाजाबाबतचा चौकशी अहवाल व संबंधितांवरील कारवाईची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शशिकांत दत्तात्रय खैरे यांनी एकाच विषयीचे अनुषंगिक, एकाच जन माहिती अधिकाऱ्याकडे एकाच दिनांकाचे (दि.२८.०५.२००७) ३ माहिती-मागणी अर्ज (जोडपत्र-अ) व एकाच अपिलीय प्राधिकाऱ्याकडे व एकाच दिनांकाने (दि.०२.०७.२००७) ३ अपिले दाखल केली. तसेच त्याच प्रकारे राज्य माहिती आयोगाकडे ३ अपिले [क्रमांक १०६७,१०६८ व १०६८(अ)] दाखल केली आहेत.

त्यापैकी २ अपिलांवर आयोगामार्फत [क्रमांक १०६८ व १०६८(अ)] यापूर्वीच (दि.२९.०९.२००८ रोजी) आदेश पारित करण्यात आले आहेत. उर्वरीत अपिलामध्ये (तसेच माहिती-मागणीचा अर्ज, प्रथम अपील यामध्येही) श्री.खैरे यांच्यासह श्री.सोपान जगन्नाथ भोंडवे यांच्या नावाचा समावेश करण्यात आला आहे. सदरहू तीनही अपिलांमधील विषय एकच आहे. सबब श्री.खैरे यांच्या यापूर्वीच्या अपिलांवरील [क्रमांक १०६८ व १०६८(अ)] निर्णय येथेही लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३० /०६/२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

ॲड. जनार्दन भिमराव जाधवर
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालय,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक ,
ग्रामपंचायत कार्यालय चुंब, ता. बार्शी, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७/२०१०/ सोलापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>ग्रामसेवक, चुंब या कार्यालयात केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती, रेकॉर्ड व ठरावाची प्रत इ. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, ॲड जनार्दन भिमराव जाधवर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय धावड
रा.कामती खुर्द, ता. मोहोळ, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, ग्रामीण, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, सोलापूर ग्रामीण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७१/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय धावड, रा.कामती खुर्द, ता. मोहोळ, जि. सोलापूर<br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, सोलापूर ग्रामीण, श्री. पी. आर. पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण ज़िल्हा पोलिस अधीक्षकांकडे गुन्ह्याबाबतच्या चौकशीसाठी दिलेल्या अर्जानुसार मोहोळ पोलिस ठाण्याने योग्य कार्यवाही केली नाही. तालुका दंडाधिकाऱ्यांनी आपल्या मागणीनुसार पोलिस सरंक्षण दिले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पुरूषोत्तम धावड यांनी केली.

श्री.धावड यांनी 'हे खरे आहे काय'? 'काय कार्यवाही करणार' ? अशा स्वरूपाचे प्रश्न 'माहिती' म्हणून विचारले आहेत. संबंधित पोलिस ठाण्याकडून माहिती मागवून त्यांना देण्यात आली. माहिती दिल्या दिवशीच त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यांचे आरोप असलेल्या व्यक्तींना अटक करावी, अशी त्यांची मागणी होती, परंतु ही बाब दिवाणी स्वरूपाची असल्यामुळे अशी कारवाई करता येत नसल्याचे त्यांना स्पष्ट केले होते. त्यांच्या मागणीनुसार पोलिस बंदोबस्त देण्याबाबत खात्री करून आवश्यक तर बंदोबस्त द्यावा, असे तालुका दंडाधिकाऱ्यांनी कळविले. त्याप्रमाणे चौकशी केली असता बंदोबस्ताची गरज नसल्याचे दिसून आले. श्री. धावड यांच्या मागणीनुसार कार्यवाही केली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, सोलापूर ग्रामीण श्री. पी. आर. पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री. धावड यांनी केलेल्या तक्रारीनुसार गैरअर्जदार यांच्यावर प्रतिबंधक कारवाई केलेचे श्री. धावड यांना दि. १३.१०.२००८ रोजी समज पत्राद्वारे कळविण्यात आले व तसे त्यांचे जबाब नोंदविण्यात आले. गैरअर्जदार यांच्यावर प्रतिबंधक कारवाई केली असल्याने माहितीच्या अधिकाराखालील आपण दिलेला अर्ज निकाली काढावा, असे श्री. धावड यांनी लेखी दिल आहे, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण श्री. ज्ञानेश्वर फडतरे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले. ते पाहता अपीलकर्त्याची मागणी,

तसेच संभाव्य कारवाई, मत अथवा भाष्य याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधाभवासमोर, पुणे ४११ ००१

श्री संजय जगन्नाथ गणेशकर ..... **अपीलकर्ता**
मु.पो.पलूस, ता.पलूस,
जिल्हा सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षक सहसंचालक, ..... **उत्तरवादी**
उच्च शिक्षण , कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी**
विभागीय सहसंचालक यांचे कार्यालय,
उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९/२०१० सांगली |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** १२ तासिकांचा कार्यभार असणाऱ्या शिक्षकांच्या पूर्णवेळ मान्यतेबाबत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय जगन्नाथ गणेशकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय

प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**स्थळ : पुणे**
**दि. ३०-०३-२०१०.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.तन्मय अरविंद देशपांडे
बिल्डिंग क्र.अ-४, फ्लॅट नं.३०३,
कुणाल आयकॉन, पिंपळे सौदागर,
औंध कॅम्प, पुणे ४११ ०२७ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९५/२००९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.०६.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.०६.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.०७.२००७ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.तन्मय अरविंद देशपांडे यांनी यापूर्वी आयोगाकडे याच विषयाबाबतचे अपील (क्र.२५३/पुणे) दाखल केले होते. या अपिलावर आयोगाने दि.३.०८.२००९ रोजी आदेश पारित केले आहेत.

प्रस्तुत अपिलामधील मूळ माहिती-मागणी अर्ज हा दि.११.०६.२००७ चा असून प्रथम अपील दि.२६.०७.२००७ रोजी अपिलीय प्राधिकारी विभागीय सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-५ यांचेकडे केले होते. तर आयोगाकडे

दि.३१.०८.२००९ रोजी अपील केले असून सदरचे अपील मुदबाह्य आहे. तसेच आयोगाकडील अपीलास झालेल्या विलंबाबाबतची कारणेदेखील समर्थनीय नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक :** ३० / ०१/२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

श्री. विलास गिरीधारीसिंह रजपूत ,
६/३, स्नेह हॅरिटेज, निसर्ग हॉटेलजवळ,
नळ स्टॉप, कर्वे रोड, एरंडवणे, पुणे - ४११ ००४.

अपीलकर्ता

विरूध्द

अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहा.सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/०७/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/०८/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/०८/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/०९/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** माहे मार्च २००९ मध्ये एस.एस.सी. बोर्डाने घेतलेल्या परीक्षेतील कु. अपूर्वा विलास रजपूत (आसन क्रमांक CO 2232) यांच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. विलास गिरीधारीसिंह रजपूत यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे

जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.०१.२०२०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

ॲड खतीब वकील
असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट प्रॅक्टिसिंग
बिफोर द चॅरिटी कमिशनर ऑफ महाराष्ट्र,
१३०/१६, झेड पी. पी. ओ सोलापूर जवळ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड,उत्तर सदर बझार, सोलापूर

**जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.२.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या कलम २०,२२,२३ अ व ५० अ नुसार दि.१.४.२००२ ते ३१.३.२००३ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयाच्या प्रती. | |

**विवेचन**

सोलापूर येथील तात्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यांनी दिलेल्या अंतिम निर्णयाची तपशिलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी

कार्यालय, सोलापूर यांच्याकडून मिळाली नाही. व अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांनी अपिलाची योग्य प्रकारे दखल न घेता अपिले फेटाळली, या कारणावरून अपिलकर्ता श्री. खतीब वकील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आपण दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय व्हावा, उपस्थितीची आवश्यकता नसल्याचे अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी दि. २१.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

अपिलकर्ता श्री खतीब वकील यांनी आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी यापुर्वी आयोगाकडे दाखल केलेल्या अपील क्र. ८३ ते ८७ / सोलापूर या अपिलातील विषय व हया अपिलातील विषय एकच असल्याने सदर अपिलकर्त्याची यापुर्वी दि.२४.८.२००९ रोजी आयोगाने दिलेले आदेश सदर ही अपिलास देखील लागू होतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २५.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**